# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक ८६-२२ दिनांक - १६/०३/२०२२

## ऑटो रिक्षा चोरीचे ३ गुन्हे उघड करुन ३ रिक्षा हस्तगत-वसई पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

दिनांक १६/०२/२२ ते ०७/०३/२२ रोजीच्या दरम्यान फिर्यादी यांची ऑटो रिक्षा स्वस्तीक अपार्टमेंट, झेंडा बाझार, कुंभार वाडा, वसई येथे बिंल्डींग खाली पार्क केली असता कोणीतरी अज्ञात इसमांनी चोरी केले बाबत तक्रार प्राप्त झाल्याने वसई पोलीस ठाणे येथे गु.र.कं ७६/२२ कलम ३७९, ३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदरील गुन्हा उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वसई पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक कौशल्याचा वापर करुन गुन्हयातील आरोपी निष्पन्न करुन दिनांक ११/०३/२२ रोजी टाकीपाडा, नालासोपारा परीसरात सापळा रचुन आरोपी नामे १) हुसेन आदम शेख, मु/३१ वर्षे यास अटक केली. तसेच सदर आरोपीताकडे अधिक तपास करून इतर दोन आरोपी नामे २) अब्दुल करीम शेख, मु/३८ वर्षे व ३) महिला आरोपी वय-३६ वर्षे यांना वसई व आचोळे परीसरातुन अटक केली आहे. सदर आरोपीतांकडे सखोल तपास करून त्यांच्याकडुन एकुण ३ ऑटो रिक्षा हस्तगत करून वसई व नालासोपारा पोलीस स्टेशन हद्दितील एकुण ०३ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२ वसई, श्री. प्रदिप गिरीधर, सहा. पोलीस आयुक्त, वसई विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वसई पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कल्याणराव कर्पे, श्री. ऋषिकेश पवळ, पोलीस निरिक्षक (गुन्हे), सपोनि/सुनिल पवार, सपोनि/राम सुरवसे, हेड कॉ./१२९५ सुनिल मलावकर, पो.कॉ/२०५२ दत्तात्रेय मुंढे, पो.कॉ/१८०० अमोल पाटील, पो.कॅा/०९१९९० जाधव, पो.कॅा/८०४ भालेराव यांच्या पथकाने केलेली आहे.

